D:\Ele.2022-23Note/Pc.2

# मुंबई विद्यापीठ

**विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निवडणूकीसाठी नोंदणीकृत पदवीधरांच्या मतदार संघाकरीता तात्पुरती मतदार यादी प्रसिध्द करणेबाबत.**

## जाहीर प्रकटन

**क्र.नि.वि./आय.सी.डी/२०२३-२४/३६.**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम २८(२)(न)[28(2)(t)] अन्वये निवडून देण्याची तरतुद आहे.

महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले सन २०१७ चे एकरूप परिनियम क्र. १ मधील मुद्या क्र. ८ मधील तरतुदीनुसार तयार करण्यात आलेल्या नोंदणीकृत पदवीधरांच्या तात्पुरती मतदार यादी तसेच अपात्र ठरलेल्या अर्जांच्या यादी (कारणासहीत) **गुरूवार, दिनांक १८ मे, २०२३** रोजी विद्यापीठाच्या https://mu.ac.in या संकेतस्थळावरील **Election 2022** या लिंकवर किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर Voter List या सदराखाली (Tab) प्रसिध्द केल्या आहेत. मतदार यादी प्रसिध्द झाल्याबद्दलची माहिती संक्षिप्त संदेश (SMS) द्वारे संबंधितांना कळविण्यात आलेली आहे.

सदर तात्पुरती मतदार यादीमध्ये वगळलेल्या किंवा चुकीच्या कोणत्याही नोंदी निदर्शनास आल्यास सदर नोंदी **गुरूवार, दिनांक १८ मे, २०२३ ते सोमवार, दिनांक २२ मे, २०२३** पर्यंत स्पष्टीकरणासह विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने निदर्शनास आणून द्याव्यात.

**सदर नोंदी निदर्शनास आणून देण्याची ऑनलाईन पध्दत खालीलप्रमाणे आहे.**

१. विद्यापीठाच्या https://mu.ac.in या संकेतस्थळावरील Election 2022 या लिंकवर किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर आपल्या संबंधित प्राधिकारणाच्या login मध्ये जाऊन आपल्या अर्जाची स्थिती पाहता येईल.

२. यासंदर्भात तात्पुरत्या मतदार याद्यांमधील काही वगळलेल्या किंवा चुकीच्या नोंदी निदर्शनास आणून द्यावयाच्या असतील, तर तेथे उपलब्ध करून दिलेल्या **Add Grievance** या **Tab** वर **Click** करून तेथील रकान्यामध्ये सदर बाब स्पष्टीकरणासह नोंदवावी. सदर स्पष्टीकरणाबाबत असणारे कागदपत्रे दिलेल्या संबंधीत जागेवर अपलोड करावेत.

३. ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त इतर कोणत्याही पध्दतीने **(Whatsapp, Email & Letter hard copy)** सदर आक्षेप किंवा सुचना नोंदविल्यास त्याची नोंद घेतली जाणार नाही. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
(प्रा. सुनिल भिरुड)
प्रभारी कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक : १७ मे, २०२३
ठिकाण : मुंबई - ४०० ०३२.